आवक क्रमांक:......३९६४.........
दिनांक:.......२१/०४/०९..........
१६/५/०९

**राज्य आयोग तसेच राज्य आयोगाच्या नागपूर, औरंगाबाद सर्कीट बेंच व नवनिर्मित सहा जिल्हा मंच कार्यालयासाठी अतिरिक्त पदे मंजुरीबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : ग्रासंक-१२०८/७४४/प्र.क्र. ३९९७/ग्रासं-३
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०९ एप्रिल, २००९

वाचा-१)अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग,शासन निर्णय क्रमांक :ग्रासंक १००२/३०८०/प्र.क्र.२६१३/ग्रा.सं.३, दिनांक २९.१०.२००४

२)अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग,शासन निर्णय क्रमांक :ग्रासंक १००२/२१५३/प्र.क्र.२८१८/ग्रा.सं.३, दिनांक २९.१०.२००४

३)अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग,शासन निर्णय क्रमांक :ग्रासंक १२०७/प्र.क्र.३७०२/ ग्रा.सं.३, दिनांक ७.६.२००८

**प्रस्तावना :-**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,राज्य आयोगाच्या नागपूर व औरंगाबाद सर्कीट बेंचसमोरील प्रलंबित प्रकरणांची संख्या विचारात घेवून तसेच नवनिर्मित गोंदिया, वाशिम, नंदुरबार, हिंगोली,मुंबई उपनगर अति.,ठाणे अति.जिल्हा मंच कार्यालयासाठी राज्यातील अन्य जिल्हा मंच कार्यालयाप्रमाणे आवश्यक अतिरिक्त पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.तसेच,संदर्भिय दिनांक २९.१०.२००४ च्या शासन निर्णयान्वये राज्य आयोगाच्या नागपूर सर्कीट बेंच कार्यालयासाठी मंजूर करण्यात आलेली वर्ग-३ व ४ ची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यास मंजूरी देण्यात आली होती. यामुळे नागपूर सर्कीट बेंच कार्यालयासाठी नियमित कर्मचारी उपलब्ध न होणे,कार्यालयीन अनियमितपणा व कामकाजाबाबतची अनास्था इत्यादीमुळे सर्कीट बेंचच्या कामकाजावर परीणाम होवून कामकाज प्रभावित झाले होते.यामुळे नागपूर सर्कीट बेंच कार्यालयासाठी मंजूर करण्यात आलेली कंत्राटी स्वरूपातील पदे नियमित स्वरूपात मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.सदरहू बाब विचारात घेवून शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**-: शासन निर्णय :-**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,मुंबई व राज्य आयोगाचे नागपूर व औरंगाबाद सर्कीट बेंच कार्यालयासाठी सदस्यांच्या प्रत्येकी एक पदासह आवश्यक कर्मचा-यांची तसेच नवनिर्मित गोंदिया,वाशिम,नंदुरबार,हिंगोली,मुंबई उपनगर अति/ठाणे अति. जिल्हा मंच कार्यालयासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची-३३ पदे याप्रमाणे एकूण (३३+३) पदांची निर्मिती करावयाच्या प्रस्तावास प्रकरणाची तातडी विचारात घेवून मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तर सचिव समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता दिली आहे.त्यानुसार, यासोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद करण्यात आल्याप्रमाणे

सदस्य-३, व आवश्यक कर्मचाऱ्यांची एकूण - ३३ पदे अशी एकूण ३३+३ पदे निर्माण करण्यास शासन याद्वारे मंजूरी देत आहे.

२. उक्त संदर्भिय क्रमांक २ नुसार दिनांक २९.१०.२००४ च्या शासन निर्णयान्वये राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या नागपूर सर्कीट बेंचसाठी मंजूर पदांपैकी वर्ग-३ च वर्ग-४ ची एकूण ८ पदे केवळ कंत्राटी पध्दतीने भरण्यास मंजूरी देण्यात आली होती.तथापि,नागपूर सर्कीट बेंच कार्यालयातील का[illegible] विचारात घेवून नागपूर सर्कीट बेंचच्या कामकाजासाठी सदरहू पदे नियमित स्वरूपात मंजूर करण्यास उच्च स्तर सचिव समितीने मान्यता दिली आहे.त्यामुळे सदरहू पदे नियमित करण्यास शासन याव्दारे मंजूरी देत आहे.

३. परिशिष्टात नमूद करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची ३३ पदे नियंत्रक, वैधमापनशास्त्र, महाराष्ट्र मुंबई यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत असून, सदरहू पदे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार विहित मार्गाचा अवलंब करुन भरण्यात यावीत.

४. याबाबतचा होणारा खर्च मागणी क्रमांक एम-२,"२४०८-अन्न साठवण व वखार साठवण-०१-अन्न-१०१-प्रापण व पुरवठा (चार) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत राज्य परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंचाची स्थापना (ए) मुंबई शहर/मुफसल (२४०८०२५१/२४०८०२६२ )०१, वैतनावरील खर्च" या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरीता मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

(भै.भा.पारधी)
उप सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

१) महालेखापाल-१ व २ (लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर.
२) महालेखापाल-१ व २ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर.
३) वित्त विभाग,(वित्तीय सुधारणा/व्यय-४), मंत्रालय, मुंबई.
४) वित्तीय सल्लागार व उप सचिव, मुंबई
५) नियंत्रक, वैधमापनशास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६)अध्यक्ष /प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
७)प्रबंधक(विधी),राज्य आयोगाचे नागपूर सर्कीट बेंच,प्रशासकीय ईमारत,नागपूर
८)प्रबंधक(विधी),राज्य आयोगाचे औरंगाबाद सर्कीट बेंच,जय टॉवरजवळ,पदमपूरा,औरंगाबाद
९)सर्व प्रबंधक,जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
१०)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
द्वारा- वित्तीय सल्लागार व उप सचिव, मुंबई
१३) निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
१४)कार्यासन अधिकारी ग्रास. २ व ४
१५) निवड नस्ती ( ग्रा.सं.३)

## परिशिष्ट - अ

(शासन निर्णय क्रमांक : ग्रासंक-१२०८/७४४/प्र क्र ३९९७/ग्रासं-३, दिनांक : ०९.०४.२००९ चे सहपत्र)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई | सहायक अधिक्षक | २ | रु.५०००-८००० |
| २ | | वरीष्ठ लिपिक | १ | रु.४०००-६००० |
| ३ | राज्य आयोग व राज्य आयोगाचे नागपूर व औरंगाबाद सर्कीट बेंच (प्रत्येकी एक पद याप्रमाणे आवश्यक सदस्य व कर्मचारी ) | सदस्य | ३ | रु.५००/- प्रति बैठक (अंशकालिक तत्वावर) किंवा दरमहा रु.१०,०००/- मानधन (पूर्णकालिक तत्वावर) |
| ४ | | लघुलेखक(उ.श्रे) | ३ | रु.६५००-१०५०० |
| ५ | | शिरस्तेदार | ३ | रु.५५००-९००० |
| ६ | | लिपिक-टंकलेखक | ३ | रु.३०५०-४५९० |
| ७ | | शिपाई | ३ | रु.२५५०-३२०० |
| ८ | गोंदिया,वाशिम, नंदुरबार,हिंगोली, मुंबई उपनगर अति.,ठाणे अति. जिल्हा मंच (प्रत्येकी एक पद याप्रमाणे) | शिरस्तेदार | ६ | रु.५५००-९००० |
| ९ | | सहायक लेखा अधिकारी | ६ | रु.५५००-९००० |
| १० | | अभिलेखापाल | ६ | रु.४०००-६००० |
| | | एकूण पदे | ३३+३ | |